# जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर
# खनिकर्म विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर
# नोंदनी क्रमांक — ई-3342/2017 दिनांक 27/11/2017

**आदेश क्र. जिखप्र/प्रमा-कृषी/200/2025**
दिनांक- 20/06/2025

**प्रशासकीय मान्यता व निधी वितरण आदेश**

विषय- प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (PMKKKY), जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर अंतर्गत **"कृषी"** या शिर्षकाखाली रामटेक, पारशिवनी व मौदा तालुक्यात खरीप हंगामात भात पिकाची उत्पादकता वाढविणेकरीता हिरवळीचे खत (ढेंचा/बोरू (ताग) पिकाचे बियाणे शेतकऱ्यांना उपलब्ध करून देणे या प्रस्तावाला प्रशासकीय मान्यता व निधी वितरण.

वाचा-
1. भारत सरकार खाण मंत्रालय प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (PMKKKY) यांचे मार्गदर्शक सूचना दिनांक 15/01/2025
2. महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग शासन निर्णय क्र. डीएमएफ-0124/प्र.क्र.10/उ-9 मंत्रालय, मुंबई-32 दिनांक 11/10/2024
3. प्रकल्प संचालक (आत्मा) कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा, नागपूर यांचे पत्र जा.क्र./ प्र.सं./आत्मा/489/2025 नागपूर दिनांक 13/06/2025
4. कृषी संचालक (आत्मा) कृषि आयुक्तालय म.रा. पुणे यांचे तांत्रिक मान्यता आदेश जाक्र. कृआ/सं.आत्मा/जि.ख.प्र.ना./हि.खत प्र./तां. मं.आ/578/2025 दिनांक 09/06/2025
5. मा. जिल्हाधिकारी महोदय यांचे दिनांक**20/06**/2025 रोजीच्या मंजुर टिपणीनूसार

ज्याअर्थी, संदर्भ क्र. 3 पत्रान्वये कृषी संचालक (आत्मा) कृषि आयुक्तालय म.रा. पुणे यांनी प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (PMKKKY), जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर अंतर्गत **"कृषी"** या शिर्षकाखाली रामटेक, पारशिवनी व मौदा तालुक्यात खरीप हंगामात भात पिकाची उत्पादकता वाढविणेकरीता हिरवळीचे खत (ढेंचा/बोरू (ताग) पिकाचे बियाणे शेतकऱ्यांना उपलब्ध करून देणेकरीता अंदाजित किंमत **रू. 89,50,500/- (अक्षरी- रू. एकोणनव्वद लक्ष पन्नास हजार पाचशे फक्त)** रकमेचा प्रस्ताव या कार्यालयास सादर केलेला आहे.

संदर्भ क्र. 4 पत्रान्वये कृषी संचालक (आत्मा) कृषि आयुक्तालय म.रा. पुणे यांनी सदर प्रस्तावास तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे.

संदर्भ क्र. 5 च्या टिपणीनुसार मा. जिल्हाधिकारी महोदयांनी सदर प्रस्तावास मंजूरी प्रदान केलेली आहे.

**नियोजित कामांचे विवरण:-**

| अ.क्र. | तालुका | कार्यान्वित यंत्रणा | कामाचे विवरण | भौतिक लक्षांक एकर | प्रशासकीय मान्यता रक्कम | या आदेशान्वये वितरीत करावयाचा 20% निधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | रामटेक | प्रकल्प संचालक (आत्मा) कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा, नागपूर | नागपूर जिल्हयात खरीप हंगामात रामटेक, पारशिवनी व मौदा तालुक्यातील लाभार्थीना ढेंचा/बोरु (ताग) बियाणे उपलब्ध करून देणे. | 1700 | 4508400 | 901680 | **प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष बाधित क्षेत्र (उच्च प्राथम्य बाबी)** |
| 2 | पारशिवनी | | | 675 | 1790100 | 358020 | |
| 3 | मौदा | | | 1000 | 2652000 | 530400 | |
| | एकुण | | | 3375 | 89,50,500 | 17,90,100 | |

**(अक्षरी- रू. सतरा लक्ष नव्वद हजार शंभर फक्त)**

त्याअर्थी संदर्भ क्र. 2 शासन निर्णयानुसार प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (PMKKKY) अंतर्गत "कृषी" या शिर्षकाखाली रू. 89,50,500/- **(अक्षरी- रू. एकोणनव्वद लक्ष पन्नास हजार पाचशे फक्त)** रकमेच्या कामांस नियामक परिषदेच्या कार्योत्तर मान्यतेचा अटीवर प्रशासकीय व वित्तिय मान्यता खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रदान करण्यात येत आहे. तसेच आदेशातील एकुण प्रशासकीय व वित्तिय मान्यतेच्या 20% निधी **रू. 17,90,100/- (अक्षरी - रू. सतरा लक्ष नव्वद हजार शंभर फक्त)** या आदेशान्वये वितरित करण्यात येत आहे.

**अटी व शर्ती:-**

1. सदर योजनेबाबत शासनाने वेळोवेळी निर्गमित मार्गदर्शक सुचना, निकष, तपासणी सुची, अटी व शर्तीनुसार योजनांवर/कामांवर खर्च करणे बंधनकारक राहील.
2. सदर आदेशातील उपकरणे, यंत्रसामुग्री, साधन सामुग्री, औषधी, सर्जिकल साहित्य, इत्यादी खरेदी करणेपूर्वी तसेच मंजूर कामे कार्यान्वित करणेपूर्वी सक्षम प्राधिकारी यांचेकडून तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक राहील. संबंधित तांत्रिक मान्यतेच्या आदेशातील अटी व शर्तीचे पालन करणे आवश्यक राहील. कामे तांत्रिक मान्यता प्राप्त प्राकलने व आराखडयानुसार कार्यान्वित करणे बंधनकारक राहील. तसेच सक्षम प्राधिकारी यांचेकडून प्राप्त तांत्रिक मान्यतेची प्रत या कार्यालयाकडे सादर करण्यात यावी.
3. या आदेशान्वये मंजूर केलेल्या कामाचे कार्यादेश वितरित निधीच्या मर्यादेत न देता अंदाजपत्रकीय किंमती एवढया संपूर्ण रकमेचे देण्यात यावे. तसेच या योजनेखाली जी कामे घेण्यात येत आहे. त्या कामांवर कंत्राटदारांना/ पुरवठादारांना अनामत रक्कम किंवा उचल देणे अनुज्ञेय नाही.
4. यंत्र/साहित्य खरेदीसाठी मंजूर निधीपेक्षा जास्त खर्च होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच प्राप्त निधी चालु वित्तिय वर्षातच खर्च करण्यात यावा.
5. जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधी अंतर्गत पुर्ण करण्यात आलेल्या कामांची, खरेदी करण्यात आलेली उपकरणे/यंत्रसामुग्रीची व इतर वस्तु/साहित्याची नोंद मालमत्ता नोंदवही/खरेदी नोंदवहीत करणे आवश्यक राहील.
6. कामाचे/ यंत्रसामुग्रीचे/ साहित्याचे परिरक्षण करण्याची ज़बाबदारी संबंधीत कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.
7. नियोजित यंत्र/साहित्य खरेदी केल्याचे देयकाची प्रत, यंत्र कार्यान्वित झाल्याचा दाखला, छायाचित्रे, उपयोगिता प्रमाणपत्र व मालमत्ता नोंदवहीत खरेदीचे नोंदी संबंधित अभिलेख्याची प्रत या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील. तसेच या कार्यालयाद्वारे वेळोवेळी विहित केलेली कामांची कागदपत्रे उदा. कामाचा कार्यारंभ आदेशाची प्रत, चालू/अंतिम देयकाची प्रत, मोजमाप पुस्तिकेची हस्तलिखित छायांकित प्रत, काम सुरू होण्यापूर्वी-काम सुरू असतांना-काम पूर्ण झाल्याची फलकासहित (अक्षांश व रेखांक्षसह) मूळ छायाचित्रे (Original Photographs), कामाचे छायाचित्रण (Video), निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र, काम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र, इत्यादी कागदपत्रे निधी मागणीचे प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक राहील.
8. सदर आदेशातील कामे अर्थसंकल्पात किंवा इतर कार्यक्रमात समाविष्ट नाही याची खात्री करूनच कामास सुरूवात करावी. तसेच सदर कार्यक्रमांतर्गत मंजूर होणारी सर्व कामे ही नविनच होणार असल्यामुळे कामांची पुनरावृत्ती होणार नाही याची संपूर्ण जबाबदारी कार्यान्विती यंत्रणेची राहील.
9. कामनिहाय दर्शविण्यात आलेली तरतूद ज्या कामाकरिता प्रस्तावित आहे. त्याच कामावर आणि मंजूर निधीच्या मर्यादेत खर्च करणे बंधनकारक राहील.
10. सदर आदेशातील कामे ही वन विभागाच्या जागेवर मोठया झाडांचे जंगल अशा जागेवर असल्यास काम सुरू करण्यापूर्वी संबंधित वन विभागाची/ राज्यशासनाची/ केंद्र शासनाची मंजूरी घेणे बंधनकारक राहील. तसेच मंजूर

कामामुळे वनसंवर्धन अधिनियमाचा भंग होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी कार्यान्विती यंत्रणेची राहील.

11. कामाची बांधकामाधिन जागा नझुलची असल्यास काम सुरू करण्यापूर्वी नझुल विभागाकडून बांधकामाकरिता मंजूरी घेणे बंधनकारक राहील. नझुल विभागाच्या मंजूरीशिवाय कोणत्याही परिस्थितीत कामास सुरूवात करता येणार नाही.
12. जिल्हा खनिज प्रतिष्ठान अंतर्गत वितरित निधी व खर्चाचे स्वतंत्र लेखे ठेवण्यात यावे. तसेच काम पूर्ण झाल्यानंतर त्यावरील बचतीची रक्कम व्याजासह या कार्यालयास 10 दिवसाचे आत धनादेश/बँक ड्राफ्टद्वारे परत करणे बंधनकारक राहील.
13. **महालेखाकार कार्यालयाद्वारे घेण्यात येणा-या लेखापरिक्षणाचे वेळी कार्यान्वितयंत्रणांनी आवश्यक अभिलेख/ कागदपत्रे उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील. महालेखाकार यांचे कार्यालयाद्वारे घेण्यात येणाऱ्या लेखापरिक्षणाचे वेळी संपूर्ण सहकार्य करणेबाबतची जबाबदारी संबंधित विभागप्रमुखाची राहिल. सदर लेखापरिक्षणाचे वेळी कोणतीही तक्रार उद्भवणार नाही याकरीता विभागप्रमुख व्यक्तीशः जबाबदार राहतील.**
14. कार्यान्विती अधिकारी यांनी कामावर खर्चाचा मेळ करतांना अहवालांद्वारे कळविण्यात येणा-या खर्चाचे आकडे व या कार्यालयाद्वारे नोंदविलेल्या खर्चाचे आकडे यांच्यात एकवाक्यता राहील याची दक्षता घ्यावी.
15. जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर योजनेच्या अंमलबजावणीतील गैरव्यवहार, लेखा आक्षेप, लोक लेखा समिती आणि विधीमंडळ कामकाज, इत्यादी बाबींसाठी संबंधीत कार्यान्विती यंत्रणा जबाबदार राहील.
16. जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर अंतर्गत प्रशासकीय व वित्तिय मान्यता प्रदान करण्यात आलेल्या कामांची प्रगती समाधानकारक नसल्यास सदर कामे (प्रस्ताव) चे आदेश पुर्व सुचना न देता रद्द करण्याचे व संबंधित अधिका-यांवर प्रचलित नियमाप्रमाणे कार्यवाही करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना राहील.
17. अंमलबजावणी करणा-या यंत्रणांनी काम चालु व समाप्तीचा अपेक्षित कालावधी/ दिनांक, बाबतची माहिती या कार्यालयास सादर करावी.
18. योजना /कामे कार्यान्वित करणे, त्याचे सनियंत्रण व देखभाल दुरूस्तीची जबाबदारी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेची किंवा शासकीय अभिकरणाची राहील.
19. जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर अंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या कामाच्या आदेशातील अटी व शर्तीत कोणत्याही वेळी पुर्व सुचना न देता वाढ करण्याचे सर्व अधिकार जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर यांना राहील.
20. योजनापूर्ण झाल्यावर त्यावर पुन्हा तरतूद केली जाणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.
21. **या योजनेंतर्गत घेण्यात येणा-या सर्व प्रकारच्या बांधकामच्या तसेच उपकरणे, यंत्राचे दर्शनी ठिकाणी फलक खालील नमूद केल्याप्रमाणे लावण्यात यावे.**

| | |
|---|---|
| PMKKKY<br>DISTRICT MINERAL FOUNDATION | **महाराष्ट्र शासन**<br>**जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर**<br>**नोंदनी क्रमांक:- ई-3342/2017, दिनांक 27/11/2017**<br>**प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना**<br>1. **कार्यान्विती यंत्रणेचे नाव:-**<br>2. **कंत्राटदाराचे नाव:-**<br>3. **कामाचे नाव:-**<br>4. **मंजूर वर्ष:-**<br>5. **मंजूर निधी:-**<br>6. **काम सुरू झाल्याची तारीख:-**<br>7. **काम पूर्ण झाल्याची तारीख:-**<br>8. **झालेला खर्च** |

22. योजनेअंतर्गत प्रकल्प संचालक आत्मा यांचे मार्फत कृषी विषयक अनुदानाचा लाभ DBT द्वारे देण्यात येईल.
23. या योजनेच्या कामावर प्रशासकीय मान्यता किंमती पेक्षा जास्त खर्च होणार नाही याची दक्षता घ्यावी.
24. योजना पूर्ण झाल्यावर त्यावर पुन्हा तरतुद केली जाणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.
25. योजना पूर्ण झाल्यावर खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र, काम पूर्ण झाल्याबरोबर काम पुर्णत्वाचा दाखला, खर्चाचा ताळमेळ इत्यादी बाबतची माहिती जिल्हा खनिज प्रतिष्ठान या कार्यालयास सादर करावी.
26. योजनेची प्रगती व फलश्रुती अहवाल दर महिन्याला कार्यान्वित यंत्रणेनी जिल्हा खनिज प्रतिष्ठान कडे सादर करणे आवश्यक राहील.
27. निवडणूक आयोगाचे वेळोवेळी निवडणूक संदर्भातील आचारसंहितेचे निर्गमित होणारे आदेश विचारात घेवून योग्य कार्यवाही करण्याचे दक्षता घेण्यात यावी.
28. या कार्यक्रमांतर्गत निर्माण होणा-या वास्तु खरेदी केलेले साहित्य, मालमत्ता सर्वस्वी शासनाच्या मालकीची राहील.
29. **कार्यान्वयीन यंत्रणेने योजनांच्या मासिक खर्चाचे अहवाल प्रत्येक महिन्याच्या 5 तारखेपर्यंत जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर ला सादर करणे आवश्यक राहील.**

या आदेशातील परिच्छेद 1 ते 29 मधील अटीच्या अधिन राहून कामे करण्याची संपूर्ण जबाबदारी सबंधित यंत्रणेची राहील.

**नोट :- प्रकल्प संचालक (आत्मा), नागपूर यांचे दिनांक** 13/06/2024 **रोजीचे पत्रानुसार रामटेक, पारशिवनी व मौदा तालुक्यात खरीप हंगामात भात पिकाची उत्पादकता वाढविणेकरीता हिरवळीचे खत (ढेंचा/बोरू (ताग) पिकाचे बियाणे शेतकऱ्यांना उपलब्ध करून देणेबाबतचा प्रस्ताव या कार्यालयात सादर केलेला असून रू.** 89,50,500/- **(अक्षरी- रू. एकोणनव्वद लक्ष पन्नास हजार पाचशे फक्त) निधीची मागणी केलेली आहे, परंतू सादर करण्यात आलेल्या प्रस्तावात बाधित व अबाधित क्षेत्रामध्ये असलेल्या लाभार्थीनिहाय (गावनिहाय) निधीची मागणी करणे अपेक्षित होते परंतू त्याप्रकारे मागणी प्राप्त झाली नसून सदयस्थितीत मागणी केलेल्या निधीपैकी** 20% **निधी वितरीत करण्यात येईल व लाभार्थ्यांची निवड झाल्यावर प्रत्यक्ष बाधित क्षेत्र व अप्रत्यक्ष बाधित क्षेत्रासंबंधिची विस्तृत माहिती प्रकल्प संचालक (आत्मा), नागपूर यांना सादर करणे बंधनकारक राहिल.**

**उपरोक्त प्रकरणी लाभार्थ्यांची प्रत्यक्ष बाधित क्षेत्र व अप्रत्यक्ष बाधित क्षेत्राची गावनिहाय यादी सादर केल्याशिवाय** 50% **रकमेचे वितरण प्रकल्प संचालक (आत्मा), नागपूर यांना केल्या जाणार नाही या अटीच्या अधीन राहुन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सदर आदेशान्वये मंजूर निधी **रू.** 17,90,100/- **(अक्षरी - रू. सतरा लक्ष नव्वद हजार शंभर फक्त)** प्रकल्प संचालक (आत्मा), नागपूर यांचे नावे Agricultural Technology Management Agency, Bank Of India, Branch- Ravindranath Tagore Road, Saving A/C No. 870910110000506 IFSC Code BKID0008709 मध्ये आर.टी.जी.एस द्वारा वितरीत करण्यात येत आहे.

(डॉ. विपीन)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
नियामक परिषद, जिल्हा खनिज प्रतिष्ठान,
नागपूर

प्रत:-

प्रकल्प संचालक, कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा), नागपूर

(डॉ. विपीन)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
नियामक परिषद, जिल्हा खनिज प्रतिष्ठान,
नागपूर

जारी करने की तारीख से 3 माह के लिए वैध VALID FOR 3 MONTHS FROM THE DATE OF ISSUE

बैंक ऑफ़ इंडिया Bank of India BOI

रविंद्रनाथ टैगोर रोड शाखा , नागपुर, महाराष्ट्र - 440001
RAVINDRANATH TAGORE ROAD Branch , NAGPUR, MAHARASHTRA - 440001
IFSC : BKID0008709

2 3 0 6 2 0 2 5
D D M M Y Y Y Y
N3518

Pay Yourself for RTGS या धारक को Or Bearer

रुपये Rupees Seventeen lakh ninety thousand one hundred only—

अदा करें। ₹ 17,90,100/-

211468 05/05/2025 48357402

खा.सं. A/c No. 870910110004835

चेक प्राप्तकर्ता की आधार संख्या (वैकल्पिक) Cheque receiver's AADHAAR number (optional)

SESHAASAI (M) / CTS-2010

हमारी सभी शाखाओं पर समाशोधन में देय PAYABLE AT ALL OUR BRANCHES IN CLEARING

DISTRICT MINERAL FOUNDATION

Please sign above

जिल्हा खनिकर्म अधिकारी जिल्हाधिकारी, नागपूर

⑈377402⑈ 440013009⑆ 005859⑈ 10

District Mineral Foundation

A/c No. 870910110004835

Beneficiary Details

| S. No. | कार्यन्विती यंत्रणा | Name of Beneficiary | Bank Name | Branch | Account Number | IFSC Code | Amount |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Project Director, (ATMA), Nagpur | Agricultural Technology Management Agency | Bank Of India | Ravindranath Tagore, Nagpur | 870910110000506 | BKID0008709 | 1,790,100 |
| Total | | | | | | | 1,790,100 |

District Mining Officer,
Nagpur

Collector, Nagpur